**निशाणी यु-६**

**उपदान प्रदान अधिनियम अर्ज क्र. ४८/२०२५**

**अर्जदार (द्रौपदाबाई बुधा कोळी) हिचा उलटतपास शपथेवर – सामनेवालातर्फे विधिज्ञ श्री. योगेश बी. कोळी**

८. मी ७ वी पास आहे. भरतीच्या वेळी वर्तमानपत्रात जाहिरात आली होती. माझी नियुक्ती नियमाप्रमाणे झाली होती, मी गावातील रहिवासी असल्याने सरळ भरती झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की माझे कार्य सेवक म्हणून होते. हे म्हणणे खरे आहे की मला माझ्या सेवेचे मानधन मिळत होते. हे म्हणणे खरे नाही की मी केंद्र सरकार किंवा जिल्हा परिषदेची कर्मचारी नव्हती. मी जिल्हा परिषदेची कर्मचारी होती. जिल्हा परिषदेच्या इतर कर्मचा-यांना लागू असलेले इतर नियम आम्हाला लागू नाहीत. मी या न्यायालयात प्रकरण दाखल केल्यामुळे आम्ही जिल्हा परिषदेकडे उपदान मिळणेकामी अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की जिल्हा परिषदेच्या इतर कर्मचा-यांना ज्या नियमाप्रमाणे रक्कम मिळते त्या नियमाप्रमाणेच मला रक्कम पाहिजे. साक्षीदार स्वत:हून सांगते की मला उपदान प्रदान अधिनियमाप्रमाणे उपदानाची रक्कम पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की मी जिल्हा परिषदेची कर्मचारी नसल्याने जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार उपदानाची रक्कम मी मागितली नसून उपदान प्रदान अधिनियमाप्रमाणे उपदानाची रक्कम मागितली आहे. मला सेवानिवृत्तीनिमित्त महाराष्ट्र शासनाने रू.१,००,०००/- (रू. एक लाख) दिले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगते की ती जीवन विम्याची रक्कम होती.

**प्रश्न** - महाराष्ट्र शासनाच्या दि.३०.०४.२०१४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे अंगणवाडी सेविकेला मदत म्हणून सेवानिवृत्तीच्या वेळी रक्कम रू.१,००,०००/- (रू. एक लाख मात्र) व मदतनीसला रू.७५,०००/- (रू. पंच्याहत्तर हजार मात्र) एकरकमी दिले होते?

वाय. बी. कोळी

**उत्तर** - ती रक्कम आम्हाला मिळाली परंतु ती रक्कम उपदानाची नव्हती.

९. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगितले आहे की मला मिळालेली रक्कम रू. १,००,०००/- (रू. एक लाख मात्र) जीवन विम्याची होती. हे मला माहिती नाही की गुजरात सरकारने महाराष्ट्र सरकारप्रमाणे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवानिवृत्तीच्या वेळी कोणतीही रक्कम दिली नाही. हे मला माहिती नाही की, मनिबेन मगनभाई बारीया यांना देखील गुजरात सरकारने मदत म्हणून कोणतीही रक्कम दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की निवृत्तीवेतन व उपदानाची रक्कम न देता आमच्या भविष्याच्या उदरनिर्वाहासाठी महाराष्ट्र शासनाने अंगणवाडी सेविकांना रक्कम रू.१,००,०००/- (रू. एक लाख मात्र) व मदतनीसला रू.७५,०००/- (रू. पंच्याहत्तर हजार मात्र) एकरकमी दिले होते. हे म्हणणे खरे नाही की जिल्हा परिषदेची कर्मचारी असल्याने मला उपदान प्रदान अधिनियम लागू नाही. हे म्हणणे खरे नाही की उपदान प्रदान अधिनियम लागू नसल्याने मी प्रस्तुतचा खोटा अर्ज केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मला रू. १,००,०००/- (रू. एक लाख मात्र) मिळाल्यामुळे मी उपदानाची रक्कम मिळणेस पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या संघटनेच्या लोकांनी माझ्यावर दबाव आणल्यामुळे व लोभापायी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

( रे. ब्रि. ठाकुर )
नियंत्रण अधिकारी, उपदान प्रदान अधिनियम
तथा न्यायाधीश, कामगार न्यायालय, जळगांव

ठिकाण – जळगांव
दिनांक - ०७.०८.२०२६